**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः25.09.2025** **वारःगुरुवार**

---

ठळक बातम्या

१) सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सरसकट मदत; दिवाळीपूर्वी मदतीचं वितरण करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन, टंचाई काळातील उपाय योजना अतिवृष्टीतही लागू करणार

२) अतिवृष्टीमुळं झालेल्या नुकसानाची दोन्ही उपमुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांद्वारे पाहणी

३) गडचिरोली जिल्ह्यात सहा जहाल नक्षलवादी शरण

४) ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉक्टर एस. एल. भैरप्पा यांचं निधन

आणि

५) आशिया करंडक क्रिकेटमध्ये भारत अंतिम फेरीत दाखल

आता सविस्तर बातम्या

**मुख्यमंत्री पाहणी**

राज्यात अनेक ठिकाणी ढगफुटी-सदृश पाऊस झाल्यानं नद्यांना पूर आला आहे. पिकांचं नुकसान झालं असून जमीन खरडून गेली आहे. या संकटकाळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं असून सर्व निकष बाजूला ठेवून सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत केली जाईल. तसंच दिवाळीपूर्वीच ही मदत शेतकऱ्यांना वितरित करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. लातूर जिल्ह्यातल्या औसा तालुक्यातील उजनी आणि निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी इथं अतिवृष्टी आणि पुरामुळं झालेल्या नुकसानाची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्यातल्या नुकसानग्रस्त भागाचीही पाहणी केली. दोन्ही जिल्ह्यात शेती, पिकं, जनावरं, घरं आणि व्यावसायिकांचं  खूप मोठं नुकसान झालं आहे.

औसा तालुक्यात उजनी इथं वार्ताहरांशी बोलतांना मुख्यमंत्र्यांनी टंचाईच्या वेळी केल्या जाणाऱ्या सर्व उपाययोजना राबवणार असल्याचं सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट-मुख्यमंत्री**

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धाराशिव जिल्ह्यातील साडेसांगवी गावाला भेट देऊन पाहणी केली आणि जिल्हाधिकाऱ्यांना तातडीनं मदत सुरू करण्याच्या सूचना दिल्या. गावातील 150 कुटुंबांना किराणा सामानाचं वाटप करण्यात आलं. बाणगंगा आणि रामगंगा नदीवर पूल बांधण्याची मागणी शेतकऱ्यांनी

केल्यावर शिंदे यांनी बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीनं कार्यवाहीचे आदेश दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही काल सोलापूर जिल्ह्यातल्या पूरग्रस्त भागाचा आढावा घेतला. करमाळा इथं उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या पुनर्वसन केंद्राला भेट देऊन त्यांनी नागरिकांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांनी ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात अतिवृष्टी आणि सीना नदीला आलेल्या पुरामुळं 792 गावं बाधित झाली आहेत. उत्तर आणि दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, माढा, करमाळा, मोहोळ या तालुक्यांना सर्वाधिक फटका बसला आहे.

**कृषिमंत्री**

एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही असं आश्वासन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जालना आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील हानीग्रस्त शेतीची पाहणी केल्यानंतर दिलं. पुढील दहा दिवसांत संपूर्ण पंचनामे पूर्ण करून दिवाळीपूर्वी मदतनिधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**बीड**

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागांची इतर विधानसभा सदस्यांसोबत पाहणी केली.

माजी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी काल बीड जिल्ह्यातल्या चौसाळा इथं अतीवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला.

**नांदेड विष्णुपुरी प्रकल्प**

नांदेड - जायकवाडीसह माजलगाव, सिद्धेश्वर, दिग्रस, येलदरी, दुधना आदी धरणांचं पाणी विष्णुपुरी प्रकल्पात येत असल्यानं प्रकल्पाचे 16 दरवाजे उघडण्यात आले आहेत. यामुळं नांदेड शहरातील अनेक सखल भागात पाणी शिरलं आहे. गोदावरी काठच्या शंभरहून अधिक कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आलं आहे. गोदावरीकाठच्या अनेक गावातील पिकं पाण्याखाली गेल्यानं शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान, लातूर जिल्ह्यात मांजरा नदीच्या पुरात विविध ठिकाणी अडकलेल्या 26 जणांची यशस्वीरित्या सुटका करण्यात आली.

**राणे मत्स्य शेती**

अतिवृष्टीमुळं मत्स्यशेती करणाऱ्या शेतकऱ्यांचंही मोठं नुकसान झालं असून, त्यांच्या नुकसानाचे पंचनामे तातडीनं पूर्ण करून त्याचा अहवाल येत्या 10 दिवसात सादर करण्याचे  आदेश मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी काल मंत्रालयात एका बैठकीत दिले. तलावातील गाळ काढला गेला नसल्यानं मत्स्य शेतकऱ्यांचं जास्त नुकसान झालं आहे.

**हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे.**

**कॅप्सूल**

**संरक्षण नवोन्मेष परिसंस्था - iDEX**

सेवा आणि सुशासन या मंत्रानं प्रेरित होऊन  पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार परिवर्तन आणि प्रगती यासाठी अथकपणे काम करत आहे. या अनुषंगानं सेवा पर्व या विशेष मालिकेत संरक्षण सर्वोत्कृष्टतेसाठी सरकार संरक्षण नवोन्मेष परिसंस्था म्हणजे आयडेक्सचे (iDEX)  बळकटीकरण करत आहे, त्याबद्दलचा हा वृत्तांत...

सरकारनं संरक्षण क्षेत्रातील नवोपक्रमांना नवोपक्रमांना चालना देणारी परिसंस्था म्हणजे आयडेक्स एप्रिल 2018 मध्ये सुरू केली. याद्वारे संशोधन आणि विकास संस्था, शैक्षणिक संस्था, उद्योग, स्टार्टअप्स आणि अगदी वैयक्तिक नवोपक्रमकांना सहभागी करून संरक्षण क्षेत्रात तंत्रज्ञान विकासाला प्रोत्साहन दिले जाते. या उपक्रमाचं महत्त्व अधोरेखित करताना पंतप्रधान म्हणाले...

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

एमएसएमई, स्टार्टअप्स, वैयक्तिक नवोन्मेषक, संशोधन आणि विकास संस्था आणि शैक्षणिक संस्थांना सहभागी करून, आयडेक्सद्वारे दीड कोटी रुपयांपर्यंतचं अनुदान दिलं जातं.  सशस्त्र दलांनी आयडेक्स-समर्थित स्टार्टअप्स आणि एमएसएमईकडून २ हजार 400 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या 43 वस्तू खरेदी केल्या आहेत.

आयडेक्स परिसंस्थेमुळं भारत संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता साध्य करण्याच्या दिशेनं वेगानं वाटचाल करत आहे.

**शरणागती**

गडचिरोली जिल्ह्यात सहा जहाल नक्षलवादी काल पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासमोर शरण आले. यात तीन महिला आणि तीन पुरुष नक्षलवाद्यांचा समावेश आहे. या सर्वांवर 62 लाख रुपयांचं बक्षीस होतं. त्यांच्या पुनर्वसनासाठी शासन 52 लाख रुपये देणार आहे.

**मंडळ-पत्रक**

राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेत सांगलीच्या तिरंगा मंडळानं पहिला क्रमांक पटकावला असून, लातूरच्या वसुंधरा वृक्षारोपी मंडळानं दुसरा तर अहिल्यानगर जिल्ह्यातील सुवर्णयोग तरुण मंडळानं तिसरा क्रमांक मिळवला आहे. जिल्हा आणि तालुकास्तरावरील विजेत्या मंडळांची घोषणाही काल पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली. प्रथम क्रमांक विजेत्या मंडळांना आज मुंबईत पारितोषिकं देण्यात येतील.

**भैरप्पा निधन**

ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉक्टर एस. एल. भैरप्पा यांचं काल बंगळुरू  इथं वृद्धापकाळानं निधन झालं. ते ९४ वर्षांचे होते. पाच दशकांपेक्षा अधिक काळाच्या कारकिर्दीत त्यांनी २५ पेक्षा जास्त कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या साहित्याचे अनेक भारतीय आणि परदेशी भाषांमध्येही अनुवाद झाले आहेत. त्यांना पद्मभूषण, सरस्वती सम्मान आणि साहित्य अकादमी फेलोशिपनं सन्मानित करण्यात आलं आहे. भैरप्पा यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दु:ख व्यक्त केलं आहे. साहित्य अकादमीचे सदस्य नरेंद्र पाठक यांनी डॉक्टर भैरप्पा यांना श्रद्धांजली अर्पण करताना आपल्या भावना व्यक्त केल्या...

**नरेंद्र पाठक बाईट**

**क्रिकेट**

आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतानं काल बांग्लादेशचा दुबई इथं ४१ धावांनी पराभव करुन अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं २० षटकांत ६ बाद १६८ धावा केल्या. बांग्लादेश संघ सर्वबाध १२७ धावा करु शकला. ३७ चेंडूत ७५ धावा फटकवणारा अभिषेक शर्मा सामनावीर ठरला. बांगलादेश-पाकिस्तान दरम्यान आज होणाऱ्या सामन्यात भारताविरुद्धचा अजिंक्यपदाचा प्रतिस्पर्धी ठरेल.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**शेवटी पुन्हा  ठळक बातम्या**

**१) सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सरसकट मदत; दिवाळीपूर्वी मदतीचं वितरण करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन, टंचाई काळातील उपाययोजना अतिवृष्टीतही लागू करणार**

**२) अतिवृष्टीमुळं झालेल्या नुकसानाची दोन्ही उपमुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांद्वारे पाहणी**

**3) गडचिरोली जिल्ह्यात सहा जहाल नक्षलवादी शरण**

**४) ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉक्टर एस. एल. भैरप्पा यांचं निधन**

**आणि**

**५) आशिया करंडक क्रिकेटमध्ये भारत अंतिम फेरीत दाखल**

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार